लोकमत

# शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश प्रक्रियेला सुरूवात

## ३० ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : सामाजिक न्याय विभागाअंतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये सन २०२४-२५ करिता व्यावसायिक अभ्यासक्रमाची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी ३० ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करायचे आहेत.

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत नागपूर जिल्ह्यात शहरातील मागासवर्गीय मुला-मुलींची एकूण १४ वसतिगृहे तसेच तालुका स्तरावर एकूण ११ शासकीय वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांमध्ये शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. गरजू व पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. ऑनलाइन पोर्टलचे हे प्रथम वर्ष आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन तसेच ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रिंट पोर्टलवरून डाऊनलोड करून त्याची प्रिंट नागपूर शहरातील प्रवेशासाठी मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, वसंतनगर, चोखामेळा परिसर, दीक्षाभूमी चौक, नागपूर येथे तसेच ग्रामीण भागातील तालुका स्तरावरील एकूण ११ वसतिगृहांत प्रवेशाकरिता संबंधित तालुक्याच्या वसतिगृहातील गृहपाल यांचेकडे सर्व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

Hello Nagpur
Page No. 4 Aug 02, 2024
Powered by: erelego.com